



Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड
# जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784

Email- jansanchlan@gmail.com






वर्ष ३ रे    अंक : २८२ वा    शनिवार  दि. ११ जानेवारी २०२५    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये


# बुलढाण्यात नोकरीच्या नावाखाली ६२ जणांना गंडावले

## गवळी कुटुंबीयांनी केली १.९६ कोटींची फसवणूक...

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलढाणा शहरात नोकरी लावून देण्याच्या नावाखाली तब्बल ६२ जणांना गंडविण्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. गवळी कुटुंबीयांनी बनावट कागदपत्रे आणि खोट्या प्रतीक्षा यादींच्या आधारे १ कोटी ९६ लाख ६७ हजार रुपयांची फसवणूक केली. मुख्य आरोपी निलेश गवळी (वय ३१) याने पत्नी कोमल, वडील विजय आणि चुलत भाऊ अंकुश यांच्यासह हा गोरखधंदा चालवला. सदर फसवणूक २०१९ ते २०२४ या कालावधीत घडली. नोकरीचे आमिष दाखवून पीडितांकडून वेळोवेळी रोख, चेक व ऑनलाइन व्यवहाराद्वारे पैसे उकळले गेले. आरोपींनी जिल्हाधिकारी कार्यालयातील कनिष्ठ लिपिक, आरोग्य सेवक, तसेच इतर सरकारी पदांसाठी खोट्या जाहिरातींनी लोकांना भूलथापा दिल्या. बनावट नियुक्तीपत्रे, मंत्रालयाचे खोटे शिक्के आणि दस्तावेज तयार करून फसवणूक केली गेली. बुलढाणा पोलिसांनी निलेश गवळीसह चार जणांविरोधात भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. मुख्य तक्रारदार विश्वनाथ गव्हाणे आणि इतर पीडितांच्या म्हणण्यानुसार, आरोपी गवळी यांनी मंत्रालयातील सचिव कक्ष अधिकाऱ्यांचे बनावट शिक्केही तयार केले होते. पैसे भरल्यानंतरही नोकरी न मिळाल्याने अनेक पीडितांना मंत्रालयाच्या फेऱ्या माराव्या लागल्या. अखेर आपण फसविले गेल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांत तक्रार दाखल केली. प्रकरणाचा




तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश मोरे करत आहेत. गुन्ह्यातील ५७ इतर पीडितांची नावे अजून गुप्त असून, त्यांची एकूण फसवणूक जवळपास दोन कोटींच्या घरात आहे. गवळी कुटुंबीयांची फसवणूक यंत्रणा उघड झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

# भुमिपुत्रांची आरोग्य सेवा राजमाता जिजाऊ चरणी ... !

## १२ जानेवारीला भक्तांच्या सेवेसाठी सिदखेडराजा येथे उभारला विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य शिबीराचे आयोजन ....!

**जनसंचलन/ सिदखेडराजा**

राष्ट्रमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त हजारो भक्त सिदखेडराजा नगरीत येतात जिजाऊ भक्तांच्या आरोग्य सुविधेसाठी केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य तपासणी आरोग्य रोगनिदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच जन्मस्थळ असलेल्या बुलढाणा जिल्ह्यातील सिदखेडराजा येथील राजे लखुजी जाधव यांच्या राजवाडा येथे जिजाऊ जन्मोत्सवा निमीत्य मॉं जिजाऊ साहेबांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी राज्यभरातून हजारो भक्त १२ जानेवारीला सिदखेड राजा नगरीमध्ये येत असतात आरोग्यसेवा हीच ईश्वरसेवा समजुन भक्तगणांच्या आरोग्य सुविधेसाठी केंद्रीय आरोग्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून विशेष वैद्यकीय सेवा मदत कक्ष आणि आरोग्य शिबिराचा आयोजन सिदखेडराजा येथील जिजाऊ विद्यालयामध्ये करण्यात आला आहे या शिबिराचे १२ जानेवारीला सकाळी ९ वा केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते होणार आहे या कार्यक्रमाला कामगारमंत्री आकाश फुंडकर आमदार मनोज कायदे माजी आमदार शशिकांत खेडेकर जिल्हाधिकारी डॉ किरण पाटील जिल्हा परिषदेचे सी ई ओ गुलाबराव खरात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ भागवत भुसारी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ अमोल गिते शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा बळीराम मापारी युवा सेना जिल्हाप्रमुख ऋषीभाऊ जाधव महिला आघाडी प्रमुख मायाताई म्हस्के अल्पसंख्यांक सेलचे जिल्हाध्यक्ष शेख सिद्धीकी शिवसेना उपजिल्हाप्रमुख बाबुराव मोरे संपर्कप्रमुख शिवप्रसाद ठाकरे माजी नगराध्यक्ष सतीश तायडे शिवसेना तालुका प्रमुख वैभव देशमुख शहर प्रमुख बालाजी मेहेत्रे उपस्थित राहणार




आहे याशिबिरत अस्थिरोग तज्ञ कान नाक घसा , मूत्रपिंड व मूत्रमार्ग विकार तज्ञ , कार्करोग तज्ञ बालरोग तज्ञ पोटाचे विकार तज्ञ कर्करोग तज्ञ मानसिक आजार तज्ञ हृदयरोग तज्ञ मेदु तपासणी आणि नेत्र तपासणी सोबतच मोफत चष्मे आणि औषधीचे वाटप करण्यात येणार आहे या शिबीरत तज्ञ डॉक्टर रुग्णाची आरोग्य तपासणी करण्यात येणार आहे या आरोग्य शिबीराचा लाभ गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन शासकीय रुग्णालय आणि शिवसेना युवा सेना महिला आघाडीच्या वतीने करण्यात आले आहे ..

# पोलिस असल्याची बतावणी वृद्धास लुटले !

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

गिरोली-जुळजापूर मार्गावर दुचाकीने जात असलेल्या वृद्धास दि. ९ जानेवारी रोजी अडवून त्यांच्याकडील रोख रकमेसह ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. प्रकरणी पोलिसांनी चार अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गोंधनखेड येथील वृद्धा केशव शंकर मांटे दुचाकीवरून जात असताना रात्री त्यांना एकाने हात देत थांबविले. त्या माणसाने मांटे यांना थांबण्यास सांगितले. सोबतच त्याच्या सहकाऱ्यांना बोलावून मांटे यांना दुचाकीवरून खाली पाडून मारहाण केली. आम्ही पोलिस आहोत असे सांगत त्यांच्या हातातील अंगठी, खिशातील रोख एक हजार रुपये,



मोबाइल असा मुद्देमाल लुटला. प्रकरणी केशव शंकर मांटे यांनी देऊळगाव राजा पोलिसात तक्रार दिली असून, पोलिसांनी चार अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये दोन पुरुष व दोन महिलांचा समावेश आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संतोष महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली देऊळगाव राजा पोलिस करत आहेत. दुसरीकडे देऊळगा राजा तालुक्यात अलिकीडल काळात चोरीच्या व लुटमारीच्या घटनात वाढ झाली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# रब्बी हंगामात ज्वारीचा पेरा वाढला...

जनसंचलन/ खामगाव



तालुक्यात रब्बी हंगामातील पिकांची लागवड अंतिम टप्प्यात आहे. अनियमित पाऊस आणि अतिवृष्टीमुळे खरिपातील उत्पादनात घट झाली आहे. आता बळीराजा रब्बीची पेरणी करीत असून, ज्वारी लागवडीत भर पडली असल्याचे दिसून येत आहे. हरभऱ्याचे पीक मोडून अनेक शेतकरी ज्वारीची पेरणी करीत आहेत. ज्वारी हे रब्बी हंगामातील पीक असून उत्पादन वाढीसाठी कृषी विभागाकडून प्रयत्न करण्यात येत आहे. आता ज्वारीची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. तसेच, ज्वारीला भाव देखील बाजारात चांगल्या प्रकारे मिळतात. त्याच उद्देशाने तालुक्यातील रब्बी हंगामातील उत्पादक शेतकरी ज्वारीच्या लागवडीला प्राधान्य देत आहेत. शासन देखील ज्वारी पेरणीला प्राधान्य देत आहे.

# वाटमारी प्रकरणातील सहा आरोपींना न्यायालयीन कोठडी

जनसंचलन/ साखरखेर्डा

मार्गावर वाटमारी करणाऱ्या सहा-ही आरोपींना न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. ४ जानेवारी रोजी या आरोपींनी मायक्रो फायनान्सच्या दोन कर्मचाऱ्यांना लुटले होते. पोलिसांनी २४ तासात या आरोपींना अटक केली होती. साखरखेर्डा ते मेहकर रोडवरील काळे पाणी शिवारात ४ जानेवारी रोजी रात्री ही घटना घडली होती. यामध्ये दोन कर्मचाऱ्यांना अडवून १ लाख ४१ हजारांची रोकड लंपास करण्यात आली होती. पवन नारायण हागे यांच्या तक्रारीवरून स्थानिक गुन्हे शाखा आणि साखरखेर्डा पोलिसांनी ही संयुक्त कारवाई केली होती. यात गणेश दादाराव गवई, मंगेश रविंद्र गवई, विलास केशव खरात, अंकित दत्तात्रय जगताप, आविष्कार तुषार गवई, अभिमन्यू रामभाऊ मंडळकर यांना अटक करण्यात आली होती. त्यांच्याकडून १ लाख ४१ हजार रुपये दोन दुचाकी व पिस्तूल आणि धारधार शस्त्र जप्त करण्यात आले होते. प्रारंभी आरोपींना तीन दिवाची पोलिस कोठडी देण्यात आली होती. आरोपींना नऊ जानेवारी रोजी सिंदखेड राजा न्यायालयाने १४ दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. प्रकरणाचा तपास ठाणेदार गजानन करेवाड हे करीत आहेत. साखरखेड्यानजीक काळेपाणी परिसरात दहा वर्षापूर्वी एका बँकेचीही मोठी रोकड लुटण्यात आली होती.

# मारहाण करून जखमी करणाऱ्यास दोन वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

जनसंचलन/ खामगाव



मारहाण करून गंभीर जखमी करणाऱ्यांविरोधात गुन्हा सिद्ध झाल्याने न्यायालयाने एका आरोपीस दोन वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली तर सबळ पुराव्यांअभावी न्यायालयाने दोघांची आरोपातून निर्दोष मुक्तता केली. हा महत्वपूर्ण निकाल न्यायाधीश ओ.ए. साने न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कोर्ट क्र १ खामगाव यांनी बुधवारी दिला. खामगाव तालुक्यातील जयपूर लांडे येथील विजय शिवहरी गंगुले (२५) याने खामगाव शहर पोलिस स्टेशनमध्ये १६ जून २०१७ रोजी दिलेल्या तक्रारीनुसार, तो १५ जूनला परिवारासोबत घरी हजर होता. दरम्यान, सायंकाळी पाऊस आल्याने संशयित कैलास पाखरे यांच्या टिनपत्र्याच्या दुकानातील पाणी घराच्या दरवाजात येत असून त्याचा त्रास होत असल्याचे त्याच्या निदर्शनास आणून दिले. त्यावेळी कैलास पाखरे याने चापटाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच संशयित कैलासचा मुलगा संतोष हा कुऱ्हाड घेऊन आला. आपल्यासह आपल्या आईला मारहाण केली. कुऱ्हाडीचा घाव डोक्यात घालून जखमी केल्याचा आरोप केला. तक्रारीवरून खामगाव शहर पोलिसांनी कैलास कनिराम पाखरे (५०), संतोष कैलास पाखरे (१९), शारदा कैलास पाखरे (४५) विरोधात भादंवि कलम ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्ह दाखल केला. तपासाअंती शहन पोलिसांनी गुन्हा सिद्ध करण्यासाठ दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले गुन्हा सिद्ध करताना न्यायालयाने सह साक्षीदार तपासले. सरकार अभियोक्ता सविता राजेश लोखंडे यांनी केलेला युक्तीवाद ग्राह मानण्यात येऊन न्यायाधीश ओ. ए साने यांनी आरोपी क्र.१ व ३ यांच निर्दोष ठरवून आरोपी क्र.२ संतोष याल २ वर्ष सश्रम कारावास व २५ हजार (पंचवीस हजार) रू. द्रव्यदंडाची तसेच दंड न भरल्यास एक महिना साध कारावास व दंडाची रक्कम फिर्यादीव जखमी यांना नुकसानभरपाई देण्याच निकाल दिला. अभियोग पक्षास एएसआय दीपक दसरकर यांनी पैर्व अधिकारी म्हणून सहकार्य केले.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेत वीज देयक शून्य

जनसंचलन/बुलढाणा



प्रधानमंत्री सूर्यघर मोफत योजनेत वीज देयक शून्य बुलढाणा : प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना ही सरकारने ग्रामीण भागातील गरीब आणि वंचित कुटुंबांना वीज उपलब्ध करून देण्यासाठी राबविलेली योजना आहे. या पर्यावरणपूरक योजनेचा जिल्ह्यातील अधिकाधिक नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले. ग्रामीण महाराष्ट्रासाठी वीज ही केवळ मूलभूत गरज नाही, तर एक विकासाची संधी आहे. सूर्यघर मोफत वीज योजना ही योजना ग्रामीण भागातील कुटुंबांना स्वच्छ, नवीकरणीय आणि दीर्घकालीन उपाय असल्यामुळे ही योजना पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. जिल्ह्यात योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरण कडून विविध माध्यमातून योजनेचा प्रसार करण्यात येत आहे. योजनेतील ग्राहकांना सर्व प्रकारचे तांत्रिक सहकार्य केले जात आहे.






दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# यशवंतराव चव्हाण राज्य वाड्:मय पुरस्कारासाठी प्रवेशिका पाठविण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाड:मय पुरस्कार योजनेतंर्गत निवडंती सन २०२४ चे राज्य वाड्:मय पुरस्कार प्रदान करण्यासाठी दि. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशीत झालेल्या प्रथम आवृत्ती पुस्तकासाठी दि. १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२५ या विहित कालावधीत प्रवेशिका मागविण्यात येत आहे. पुरस्कार नियमावली नुसार पात्र लेखक, प्रकाशक यांना या योजनेत भाग घ्यावयाचा असल्यास त्यांनी प्रत्येक प्रवेशिका प्रपत्रासोबत आपल्या पुस्तकांच्या दोन प्रती विहती नमुन्यातील अर्जासह स्थानिक निधी शाखा जिल्हाधिकारी कार्यालय बुलढाणा येथे ३१ जानेवारी २०२५ पूर्वी सादर करावे, असे आवाहन तहसिलदार यांनी केले आहे.

# मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन

जनसंचलन/बुलढाणा

मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे रविवार दि. १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११ वाजता स्वामी विवेकानंद जयंती निमित्त राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात येत आहे. या दिनाचे औचित्य साधून संस्थेमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात गुणवत्ता प्राप्त प्रशिक्षणार्थ्यांचा सत्कार करण्यात येईल. तसेच आत्मनिर्भर भारत, स्वामी विवेकानंद यांचे उद्योजकता, देशाच्या विकासात कौशल्याचे महत्व, एआय शाप की वरदान अशा विविध विषयांवर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा व चित्रकला स्पर्धा घेण्यात येणार आहे. स्वामी विवेकानंद यांचा तरूणांच्या उत्तम शरीरयष्टीकडेही विशेष कल होता. त्यामुळे पारंपारिक क्रीडा स्पर्धा सुद्धा घेण्यात येणार आहे. या स्पर्धेतील उत्कृष्ट स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात येईल. कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष, आमदार, समाजसेवक उद्योजक व व्याख्यानकार यांना आमंत्रित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे आजच्या तरूणांना पुढील भविष्याकरीता रोजगार व स्वयंरोजगार यांवर मार्गदर्शन सुद्धा केल्या जाणार आहे. त्यामुळे कार्यक्रमाचा आस्वाद घेण्यासाठी व आपल्या मुलांच्या पुढील उज्वल भवितव्यासाठी नागरीकांनी आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एस. ही गंगावणे यांनी केले आहे.

# खतांचे दर वाढल्याने फटका...

जनसंचलन/ खामगाव

कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांना शेती उपयोगी साहित्याच्या भावात दिवसागणिक मोठ्या प्रमाणात वाढ होताना दिसत आहे. शेतीत लागणारा मुख्य घटक म्हणजे खत. त्याच्या किमतीत मागील दहा वर्षांत ४०० ते ५०० रुपयांनी वाढ झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे. शेतीमध्ये खरीप आणि रब्बी हंगामात पिके घ्यायची म्हटलं तर रासायनिक खताशिवाय शेतकऱ्यांना पर्याय नाही. खताच्या किमती कितीही गगनाला भिडल्या तरी उसनवारी पैसे उचलून खते घ्यावीच लागतात. मागील दहा वर्षांच्या काळात खताची डीएपीची बॅग १५९० रुपयांवर येऊन ठेपली आहे. त्या तुलनेत सोयाबीनला मात्र भाव नाही. यामुळे आता पुढील काळात शेती करायची कशी हा मोठा प्रश्न शेतकऱ्यांमध्ये उपस्थित होत आहे. खतांच्या किमती ज्याप्रमाणे वाढत आहेत, त्यानुसार सोयाबीनचा भाव जर वाढला असता तर शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असता.

# मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे कार्यशाळा संपन्न


जनसंचलन/बुलढाणा

मोताळा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे दि. ९ जानेवारी रोजी विशेष गतीमानता पंधरवडामार्फत मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनाबाबत कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी तज्ञाव्दारे प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. जिल्ह्यातील युवक-युवतीच्या सर्जनशीलतेला वाव मिळून स्वयंरोजगारास पूरक वातावरण मिळावे तसेच ग्रामीण व शहरी क्षेत्रात सुक्ष्म, लघु उपक्रमांव्दारे व्यापक रोजगाराच्या संधी व शासनाच्या आर्थिक सहाय्यातून प्रकल्प उभारणीसंदर्भातील माहिती प्रशिक्षणार्थ्यांना होण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उद्योग अधिकारी एन एस. पाटील व मिटकॉनचे जिल्हा समन्वयक कैलास स्वराटे यांनी शासनाच्या विविध योजना व उद्योग उभारण्याबाबतची माहिती देऊन मार्गदर्शन केले. शासकीय नोकरी मिळणे सोप नसून उद्योग उभारणी करुन रोजगार निर्मिती करण्याचे आवाहन उभयतांनी केले.

# देऊळगाव कुंडपाळ येथील युवकाचा अपघातात मृत्यू

जनसंचलन/ देऊळगाव

देऊळगाव तालुक्यातील तळणी येथे बोअरवेलच्या गाडीला पाठीमागून दुचाकी धडकल्याने देऊळगाव कुंडपाळ येथील २० वर्षीय युवकाचा मृत्यू झाला ही घटना ८ जानेवारी रोजी रात्री ८ वाजता घडली. तुषार विजय राठोड असे मृतक युवकाचे नाव आहे मंठा तुषार हा आर्मी भरतीची तयारी करत होता. तो आपल्या नातेवाईकांना भेटून परतत असताना त्याची दुचाकी क्रमांक एमएच २८ एए २४८० ही उभ्या असलेल्या बोअरवेलच्या गाडीला पाठीमागून जोरात धडकली. या अपघातात तुषारच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. पेट्रोल पंपावरील कर्मचाऱ्यांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली; मात्र धडक एवढी जोरदार होती की, तुषारला वाचवता आले नाही. अपघातानंतर गाडीचालक लोणारच्या दिशेने पळून गेल्याचे सीसीटीव्ही फुटेजमध्ये आढळून आले आहे. तुषारचे वडील निवृत्त सैनिक आहेत. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेह मंठा येथील रुग्णालयात पाठवला होता तेथे शवविच्छेदन केल्यानंतर तुषार राठोडच्या पार्थीवावर ९ जानेवारी रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले




## हॉस्पिटलमध्ये तोडफोड करणाऱ्यांना कारावासाची शिक्षा

# प्रथमश्रेणी न्यायालयाचा आदेश खासगी रुग्णालयातील घटना

जनसंचलन/ खामगाव

विष प्राशन केलेल्या व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या नातेवाईक व मित्रांनी एका खासगी हॉस्पीटलमध्ये तोडफोड केल्याच्या घटनेतील आरोपींना प्रथमश्रेणी न्यायालयाने एक महिन्याची शिक्षा आणि १ हजार रुपये प्रत्येकी दंड अशी शिक्षा सुनावली आहे. एका व्यक्ती विष प्राशन केल्याने त्याच्यावर डॉ. आशिष सुभाष अग्रवाल यांच्या रुग्णालयात उपचार सुरू होते. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मृत्यूमुळे संतापलेल्या त्यांच्या नातेवाईक व मित्रांनी रुग्णालयात तोडफोड करून डॉक्टरला मारहाण केली. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले. न्यायालयाने सरकार पक्षाचे ५ साक्षीदार तपासले. प्रकरणातील साक्षी, पुरावे तसेच परिस्थितीजन्य पुरावे सिध्द झाल्याने प्रथमश्रेणी न्यायाधीश ओ. ए. साने यांनी सर्व आरोपींना कलम १४३ मध्ये १५ दिवसांची शिक्षा आणि ५०० रुपये दंड, कलम ४२७ मध्ये १५ दिवसांची शिक्षा आणि ५०० रुपये दंड असा एकूण १ महिना शिक्षा आणि १ हजार रुपये दंड ठोठावण्यात आला. सरकार पक्षातर्फे सरकारी वकील सविता लोखंडे यांनी तर पैरवी अधिकारी म्हणून एएसआय दीपक दसरकार यांनी काम पाहिले

# आमदार संजय गायकवाड यांच्याकडून पत्रकारांना मिळाले विम्याचे कवच कुंडल...

## मराठी पत्रकार संघाच्या आव्हानाला साथ देत असंख्य पत्रकारांनी मेगा कॅम्पमध्ये सहभागी होऊन विमा कवच मध्ये केली नोंदणी

जनसंचलन/बुलढाणा

पत्रकार भवन बुलढाणा येथे आज दि १० जानेवारी रोजी पत्रकारांच्या हितासाठी विमा कवच कुंडल याचे आयोजन करण्यात आले होते. या शुभ कार्यासाठी दि ९ जानेवारी रोजी जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने आव्हान करण्यात आले होते या आव्हानाला पत्रकारांनी मोठ्या संख्येने साथ दिली. पत्रकार भवन येथे येऊन सर्वांनी आपला विमा काढून घेतला आहे. समाजाचे आरोग्य सांभाळणारा पत्रकार हा स्वतः च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत असते. समाज हिताची काळजी घेणाऱ्या पत्रकाराची काळजी घेतली जावी, त्याला जीवन सुरक्षा प्रदान व्हावी, या उदात्त हेतूने बुलढाण्याचे लोकप्रिय आमदार संजय गायकवाड गायकवाड यांनी पत्रकारांना विमा संरक्षण देण्याचा स्वागतार्ह निर्णय घेतला. दि १० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता बुलढाणा जिल्हा पत्रकार भवन या ठिकाणी आयोजित विम्याच्या मेगा कॅम्पमध्ये पत्रकारांनी सहभागी व्हावे असे आवाहन बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाकडून करण्यात आले होते. मराठी पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष रणजीत सिंगराजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली या कॅम्पचे आयोजन करण्यात



आले होते. आव्हानाला पत्रकारांनी साथ दिली मोठ्या संख्येने पत्रकार या ठिकाणी उपस्थित होते. मराठी पत्रकार परिषद संलग्नित बुलढाणा जिल्हा पत्रकार संघाकडून ०६ जानेवारी मराठी पत्रकार दिनी पत्रकारांसाठी आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामध्ये ५० पेक्षा अधिक पत्रकारांनी सहकुटुंब आरोग्य तपासणी करीत शिबिराचा लाभ घेतला होता. त्याचवेळी पत्रकारांना विम्याची संरक्षण असावे, असा एक सूर पत्रकारांमधून उमटला होता. आ. गायकवाड यांनी भारतीय डाक विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या १० लाख रुपयांच्या अपघाती विम्याची पत्रकारांसाठी तरतूद केली. पत्रकारांच्या समस्या वेदना काय असते हे आमदार संजय गायकवाड यांनी सांगितले आहे. पत्रकार हा लढा देत असतो मात्र संकटाच्या काळी त्याच्यावर काही दुर्घटना घडल्यास त्याचा परिवार हा



उघड्यावर पडतो त्यामुळे त्यांच्यावर अशी विपरीत वेळ येऊ नाही म्हणून यांनी विमा कवच आयोजित केला. पत्रकारांसाठी १० लाख रूपयांचा अपघाती विमा आ.गायकवाड यांच्या माध्यमातून उतरविण्यात आला आहे यामध्ये अपघाती मृत्यू झाल्यास, कायमचे अपंगत्व आल्यास १० लाख रूपये, दवाखान्याचा खर्च ६० हजार रूपये, मुलाच्या शिक्षणाचा खर्च १ लाखा रूपयापर्यंत, ॲडमिट असेपर्यंत १ हजार रूपये, ओपीडी खर्च ३० हजार रूपये अशा प्रकारचे स्वरूप भारतीय डाक विभागाच्या अपघात विमा योजनेचे आहे.

# रांगोळीने रेखाटली माँ जिजाऊची ४ हजार ८४३ स्केअर फुटाची भव्यप्रतिमा !

### कलाकृती ही लिमका बुक ऑफ रेकॉर्ट साठी राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल मॅनेजमेंटने नामांकनासाठी पाठवली !

जनसंचलन/ देऊळगाव राजा

माँ जिजाऊ जन्मोत्सवा निमित्त देऊळगाव राजा येथील राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूलमध्ये माँ जिजाऊ साहेबाची सर्वात मोठी ४ हजार ८४३ स्केअर फुटाची भव्यप्रतिमा रांगोळी ने रेखाटली आहे. माँ जिजाऊ चा जन्मोत्सव सिंदखेड राजा मतदार संघात मोठ्या उत्साहाने १२ जानेवारीला साजरा होतो. यावर्षी माँ जिजाऊ जयंती भव्य -दिव्य असेल त्यासाठी कारणही तसेच आहेत देऊळगाव राजा येथील राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल देऊळगाव राजा येथे रांगोळीने ४८४३ स्क्वेअर फुटाची माँ जिजाऊ ची भव्य दिव्य प्रतिमा रांगोळीने रेखाटली आहे. या प्रतिमेसाठी ४०० किलो रांगोळी लागली असून विद्यार्थी - आणि विद्यार्थिनी तसेच कला शिक्षक सदानंद झिंजे सर यांनी २८ तासात ही भव्य रांगोळी काढली यासाठी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीनलताई शेळके , सचिव डॉ. रामप्रसाद शेळके यांनी ही मार्गदर्शन केले असून मां जिजाऊ यांची भव्य दिव्य रांगोळी प्रतिमा पाहण्याचे आव्हाहन केले आहे यावेळी सीईओ सुजित गुप्ता, अकॅडमीक हेड डॉ.प्रियंका देशमुख ,फैजल उस्मानी ,शिक्षक- शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली सदर कलाकृती ही लिमका बुक ऑफ रेकॉर्ट साठी राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल मॅनेजमेंट ने नामांकना साठी पाठवली आहे.

# काजू-बदामसह साहित्यावर चोरट्यांचा डल्ला



जनसंचलन/ वरवट बकाल

मध्यवर्ती ठिकाण असलेल्या वरवट बकाल येथील किराणा, ज्वेलर्स, हार्डवेअर दुकानातून २ लाख ७४ हजार ४०० रुपये अज्ञात चोरट्याने लंपास केल्याची घटना ९ जानेवारी रोजी उघडकीस आली. याबाबत अजय काशिनाथ खारोडे यांनी तक्रार दिली. त्यामध्ये त्यांच्या दुकानातील असलेला ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले नगदीसह बदामचे २ कट्टे, किंमत ४० हजार रुपये, काजूचे दोन डबे किंमत १८ हजार रुपये, असा एकूण ६९,५०० रुपयांचा माल तसेच रूपेश रतनलाल वर्मा यांच्या रुद्राक्ष ज्वेलर्समधून नगदी, चांदीचे घुंगरू, ब्रेसलेटसह इतर साहित्य मिळून एकूण २२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. तसेच मनीष जमनादास गांधी यांच्या एजन्सीमधून ४५ हजार रुपयांचे साहित्य, सचिन गंगाराम कडू यांच्या दुकानातून १ लाख ३७ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याबाबत अजय काशिनाथ खारोडे यांनीही तामगाव ठाण्यात तोंडी तक्रार दिली आहे. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिताच्या (बीएनएस) कलम ३३४ (१), ३०५ (अ) प्रमाणे गुन्हे दाखल केले. ठाणेदार राजेंद्र पवार यांचे मार्गदर्शनात पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विलास बोपटे करीत आहेत.

# सिंदखेड राजा तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलाठ्यांना लॅपटॉपचे वाटप

जनसंचलन/सिंदखेड राजा

तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलठ्यांना नव निर्वाचित आमदार मनोज देवानंद कायदे यांच्याहस्ते नुकतेच लॅपटॉप व प्रिंटर वाटप करण्यात आले. यावेळी शेतकऱ्यांना वेगवान सेवा देऊन त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून द्या. तसेच, जमिनीचे रेकॉर्ड डिजिटल करून शेतकऱ्यांना तत्पर सेवा द्या, असे आवाहन याप्रसंगी मनोज कायदे यांनी केले. सिंदखेडराजा तहसिल कार्यालयात ९ जानेवारी २०२५ रोजी आयोजित लॅपटॉप व प्रिंटरचे वाटप प्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदार अजित दिवटे, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष ॲड. नाझेर काझी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. जमिनीचे रेकॉर्ड डिजिटल करून नागरिकांना तत्पर सेवा मिळावी, यासाठी राज्य सरकारने तलाठी व मंडळ अधिकारी यांना लॅपटॉप व प्रिंटर दिले आहेत. त्यानुसार, सिंदखेडराजा तहसील कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमात आमदार मनोज कायदे यांच्याहस्ते तलाठी व मंडळ अधिकारी यांना लॅपटॉप व प्रिंटर वाटप करण्यात आले. तसेच, पहिल्यांदा सिंदखेडराजाचे आमदार झाल्याबद्दल मनोज कायदे यांचा सत्कारही उपविभागीय अधिकारी प्रा. संजय खडसे, तहसीलदारांच्या हस्ते करण्यात आला.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958